MHST090008822015

## नि.दि.दा.क्र. १४०/२०१५ मधील निशाणी क्र. ८७ वरील आदेश

प्रतिवादी क्र.९ व १० यांनी सदरचा अर्ज त्यांचे विरुद्ध झालेला विना कैफियत आदेश रद्द होवुन त्यांची कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्ज व म्हणणे अवलोकन केले. वादी आणि प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

३. सदर दावा सरस निरस मानाने वाटप व दरम्यानचे उत्पन्नाकरीता दाखल करण्यात आला आहे. सदरचा दावा गुणावगुणावर निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे. न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तूत प्रतिवादी यांना याच न्यायालयात त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक वाटते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास वाद मुद्दयांचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द होईल. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास त्यांना न्यायदान नाकारल्यासारखे होणार आहे. त्यामुळे त्यांना त्यांची कैफियत स्वीकारण्याची परवानगी देणे न्यायोचित वाटते. प्रस्तुत प्रतिवादी क्र. ९ व १० यांना समन्सची बजावणी २०१९ साली झाली आहे. प्रतिवादींनी सदरचा अर्ज दिनांक ०६/०२/२०२५ रोजी

दिला आहे. त्यामुळे प्रतिवादींना कैफियत देण्यास ५ वर्षाहुन अधिक कालावधीचा विलंब झालेला आहे असे दिसुन येते. सबब, प्रस्तूतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे असे मला वाटते. परिणामी, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे :

**आदेश**

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.९ व १० यांनी रुपये ३०००/– (रु. तीन हजार फक्त) खर्चाची रक्कम जमा करावी, यापैकी त्यांनी रुपये १५००/– (रु. एक हजार पाचशे फक्त) वादींना दयावेत व उर्वरित रक्कम सरकार जमा करावी.

३. प्रतिवादी क्र.९ व १० यांनी वरील पुर्तता केल्यानंतर त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो व त्यांच्या विरुद्ध झालेला विना कैफियत आदेश रद्द करण्यात येवून त्यांची कैफियत स्वीकारणेत येते.

ANKUSH ATMARAM PACHARNE

Digitally signed by ANKUSH ATMARAM PACHARNE
Date: 2025.02.07 13:10:07 +0530

स्थळ : कोरेगाव (ए. ए. पाचरणे)

दिनांक : ०६/०२/२०२५ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर कोरेगाव.